*मौलिक विचार माला - १८*

मधुराद्वैताचार्य श्रीगुलाबरावमहाराजांचा

# काव्य-विचार

काव्यसूत्रसंहिता



रु. ५

* डॉ. कृ. मा. घटाटे.





## श्रीगुलाबरावमहाराज : जीवनकार्य

(इ.स.१८८१ ते १९१५)

**''युक्तीने पटवून देण्याचा माझा बाणा आहे''**

प्रज्ञाचक्षू श्रीगुलाबरावमहाराज म्हणजे विदर्भातील माधानचे गुलाब गुंडोजी मोहोड. चवथ्या महिन्यात नेत्रहीन, माधान-खेड्यातील जीवन, शिक्षणाचा अभाव आणि आयुष्य केवळ ३४ वर्षे ! अशी सर्वतः विपरीत परिस्थिती असूनही महाराजांनी केलेल्या ग्रंथलेखनरूप ज्ञानयज्ञाचे कार्य अजोड आहे.

श्रीमहाराजांची श्रीकृष्णाचे ठिकाणी माधुर्यभक्ती असल्यामुळे ते स्वतःला ज्ञानेश्वरकन्या आणि कृष्णपत्नी म्हणवीत.

श्रीमहाराजांनी ''श्रीज्ञानेश्वर मधुराद्वैत संप्रदाय'' प्रवृत्त केला. हा नाथसंप्रदाय असून उपास्यत्वेकरून वारकरी पंथाची शाखा आहे.

संतांची ज्ञानोत्तर पराभक्ती आणि शंकराचार्यांचा अद्वैत वेदान्त यांचा समन्वय करून शास्त्रीय खंडनमंडन पद्धतीने भक्तिशास्त्राची नवीन स्वरूपात मांडणी केली.

भगवंताचा सगुण विग्रह मिथ्या नसून सच्चिदानंदघन शुद्ध ब्रह्मस्वरूप आहे. तो ज्ञानानेही नाश पावत नाही, यासाठी अगदी नवीन शब्दयोजना सुचवून शंकराचार्यांच्या अद्वैतात





'अनध्यस्तविवर्त' या भक्ति-संकल्पनेचे नवे योगदान दिले.

जगातील सर्व धर्मांत आणि हिंदुसमाजातील विभिन्न घटकात परस्पर द्वेष वाढू नये म्हणून महाराजांनी समर्थ असा सर्वधर्मसमन्वयाचा मूलगामी सिद्धान्त जगापुढे मांडला. आणि आर्य-अनार्य, आर्य-दस्यु, आर्य-द्रविड, ब्राह्मण-ब्राह्मणेतर, उत्तर-दक्षिण, इत्यादि द्वेषभावनेला आणि त्यामुळे उत्पन्न झालेल्या असंतोषाला मूठमाती देण्यासाठी समन्वयरूपी प्रभावी हत्यार विचारवंतांच्या हाती दिले.

* शांकर अद्वैत आणि भक्तीचा पूर्ण समन्वय.
* भक्तिशास्त्राची निर्मिती.
* भक्तीच्या नव्या १६ प्रकारांची मांडणी.
* ज्ञान, उपासना आणि भक्तीतील भेदविवेचन.
* माधुर्यभक्तीवरील आक्षेपांचे निराकरण आणि तिच्या सर्वोच्चतेचे शास्त्रीय प्रतिपादन.
* नाममहात्म्य अर्थवाद आहे या आरोपाचे सविस्तर खंडन.
* योगी, ज्ञानी व भक्त यांच्यातील सूक्ष्म भेदांचे प्रतिपादन.
* समन्वयाच्या नऊ प्रकारांचे विवेचन.
* षड्दर्शने परस्परविरोधी नसून परस्परपूरक आहेत याची नवीन संदर्भात मांडणी.
* सांख्य सेश्वर आहे याची सप्रमाण सिद्धी.
* आधुनिक योग्यांच्या कुण्डलिनी-चक्रे-नाड्यांसंबंधी चुकीच्या संकल्पनांचे खंडन.
* योगदर्शनात अनेक नवीन प्रक्रियांची निर्मिती.





* स्वप्नातून परमार्थ प्राप्तीची प्रक्रिया.
* आन्तर् आणि बाह्य समाधीचे नवे मूलगामी विवेचन.
* पूर्वमीमांसेचे काही अंशी खंडन व उत्तरमीमांसेसाठी तिचा उपयोग.
* उत्क्रांतिवाद, अणुवाद, अज्ञेयवाद, संशयवाद वगैरे पाश्चात्य तत्त्वज्ञानांची भारतीय सिद्धांताशी तुलना आणि मूल्यमापन.
* नीतिशास्त्रातील युरोपियन मतांचे खंडन. त्यांचा भारतीय नीतीशी वेगळ्या रीतीने समन्वय आणि दैनंदिन सदाचाराचा उपदेश.
* पाश्चात्य आणि भारतीय मानसशास्त्रांशी तुलना.
* ॲलोपॅथी व आयुर्वेदाची तुलना आणि मानसायुर्वेदाची निर्मिती.
* इस्लाम, ईसाई, पारशी, बौद्ध, जैन, वगैरे सर्व वैदिक धर्माच्या शाखा आहेत या सिद्धान्ताचे प्रमाणपुरस्सर शास्त्रशुद्ध विवेचन.
* वर्णाश्रम व्यवस्थेचे मूल्यमापन.
* ब्राह्मण-ब्रह्मणेतरवाद आणि आर्य-अनार्य वादांसंबंधी तौलनिक विवेचन.
* बुवाबाजीचा दंभस्फोट.
* धर्मसंकर, धर्मसुधारणा आणि धर्मसमन्वय यातील भेद विवेचन.
* वेदांवर आणि पुराणांवर समन्वयात्मक सूत्रग्रंथांची रचना.

* प्राचीन आर्यांची विविध शास्त्रे आधुनिक विज्ञानाचे आणि तत्त्वज्ञानांचे मूळ स्त्रोत असल्याचे युक्तिसिद्ध प्रतिपादन.
* न्याय वैशेषिकातून प्राचीन आर्यांचे भौतिक विज्ञान कसे विकसित करावे, याचे मार्गदर्शन.
* मनोविज्ञान, काव्यशास्त्र, संगीत, आयुर्वेद वगैरे शास्त्रांची षड्दर्शनानुसार प्रस्तुती.
* इतिहास कोणी कसा लिहावा, आणि कोणत्या इतिहासावर विश्वास ठेवावा; याचे मार्गदर्शन.
* ''आर्य वंश नाही, आर्य बाहेरून आले नाहीत, शूद्र वर्ण हा आर्यांचाच भाग आहे'' या ऐतिहासिक सत्याचे मुद्देसूद प्रतिपादन : उत्तरध्रुवीय मताचा परामर्श.
* ''तीन हजार वर्षापूर्वी आर्य संस्कृती विश्वव्यापक होती'' या ऐतिहासिक सिद्धान्ताची पुनर्स्थापना.
* डार्विन, स्पेन्सर, ॲनीबेझंट वगैरेंच्या उत्क्रांतिवादाचे खंडन.
* सुधारणा आणि बहुमत यांचे संबंधी परखड विचार.
* शिक्षणासंबंधी मूलभूत विचार.
* प्राचीन व अर्वाचीन संगीताची तुलना, भातखंडेंचे खंडन व तात्त्विक प्रश्नांचा उहापोह.
* प्राचीन सूत्र कायम ठेवून नवीन साहित्यशास्त्राची निर्मिती.
* ''प्रक्षिप्त आणि भाषाभिन्नतेवरून लेखकभिन्नता'' हे आधुनिक संकेत संत-साहित्याला किंवा आर्ष-वाङ्मयाला लागू पडत नाहीत याचे स्वतःच्या उदाहरणावरून





प्रतिपादन.
* कौटुंबिक व सामाजिक संबंधात प्रश्नोत्तर रूपाने मार्गदर्शन.
* मुलांसाठी उपदेश. * स्त्रीगीतांची निर्मिती.
* लोकगीतातून समाजप्रबोधन.
* नवीन १२३ मात्रावृत्तांची रचना.
* नवीन लघुलिपीची (सांकेतिकलिपी) निर्मिती.
* नवीन 'नावंग' भाषेची निर्मिती.
* नवीन व्याकरण सूत्रे.
* आत्मचरित्र लेखन. * नाटक लेखन. * १७ आख्यानांची रचना.
* खेळातून परमार्थप्राप्तीची प्रक्रिया : मोक्षपट.
* संस्कृत, हिंदी, मराठी, वऱ्हाडी व व्रजभाषेत एकूण लहानमोठ्या १३९ ग्रंथांची रचना.
* पत्रे-११८ *अभंग-२०९९, *पदे-२२५२, *गीत-१२५०,
* श्लोक– १०००,
* ओव्या - २३०००, *एकूण पृष्ठे ६०००.

बालपणी नवव्या महिन्यात नेत्रहीन झालेल्या महाराजांच्या केवळ ३४ वर्षाच्या अल्पायुष्यात अनेक ज्ञानशाखांना कवेत घेणाऱ्या योगदानाचा विचार केला असता- अल्पवयात अजोड कार्य करणाऱ्या पूज्यपाद श्री आद्यशंकराचार्य व श्रीज्ञानेश्वर महाराज यांचीच आठवण येते आणि भारतातील महर्षी भगवान् श्रीव्यासांच्या सर्वस्पर्शी ज्ञानपरंपरेचा स्त्रोत अखंड असल्याची जाणीव होते. ०००





## गानवित्-संगीतशास्त्रकार-गायक, कवि, काव्यज्ञ, भक्त इ. भूमिकांतून रचलेले



### काव्यशास्त्र

# काव्य-विचार

(काव्यसूत्रसंहिता ९२ सूत्र)

श्रीगुलाबरावमहाराजांनी अनेक शास्त्रांब शास्त्रीय पद्धतीने ग्रंथरचना केल्या आहेत. त्यापैकी काव्यशास्त्र हे एक आहे. साहित्य क्षेत्रात काव्याचा अभ्यास करताना अभिनवगुप्त, जगन्नाथ पंडित वगैरे मोठमोठ्या काव्यज्ञांच्या विचारांचा अभ्यास करण्यात येतो आणि युरोपीय पंडितांच्या उपपत्तींचाही विचार होत असतो; परंतु संतकवींनी मांडलेले काव्यासंबंधीचे विचार मात्र अगदी सपशेल दुर्लक्षिले जातात. 'भक्तिपर





काव्याचा शास्त्रीय दृष्टिकोणातून विचार करण्याचे कारण नाही' असे वाटल्यामुळे असे होणे स्वाभाविक आहे. किंवा असेही म्हणता येइ की संतांच्या जीवनाचा आनंद केवळ भक्तीत सामावलेला असतो तर कवी, रसिक किंवा काव्यज्ञ हे काव्यातील रसास्वादात मग्न असतात. त्यामुळे भक्तीविरहित काव्यातील संतांनी दाखविलेले दोष या आधुनिक साहित्यिकांना आवडणे शक्य नसल्याने संतांच्या काव्यविचाराकडे त्यांनी दुर्लक्ष केले असावे.

या पार्श्वभूमीवर पाहतां श्रीगुलाबराव महाराज स्वतः संत होते. भक्तिकाव्याची श्रेष्ठता त्यांच्या अंतःकरणात प्रकर्षाने रुजली होती. तरी त्यांनी काव्यशास्त्रावर 'काव्यसूत्र-संहिता' हा ९२ सूत्रांचा ५ अध्यायांचा शास्त्रीय सूत्रग्रंथ

रचून साहित्यक्षेत्रात नवे योगदान दिले आहे. संतांच्या काव्य-विचारांची शास्त्रीयता उलगडून स्पष्ट केली आहे.

महाराज स्वतः उच्च कोटीचे साहित्यिक होते. त्यांच्या गद्य लेखनातील भाषाशैली प्रासादिक आहे. त्यांची कविता श्रेष्ठ दर्जाची आहे. त्यांच्या एकूण लेखनातील असलेल्या विषयांचा व्यापही फार मोठा आहे.

त्यांनी ओवी, अभंग, पदे, गीते, आर्या, दोहे, चोपाई, सवैय्या, चूर्णिका वगैरे अनेक मराठी आणि हिंदी काव्यप्रकार, मराठी-हिंदी-संस्कृत या तीनही भाषात रचना करून, समर्थपणे हाताळले आहेत. १२२ नवीन मात्रावृत्तांची रचना केली आहे. स्वतःच्या प्रत्येक पदाला चाल, राग, ताल वगैरे जोडून गेयता





आणली आहे. आणि या सर्वांपेक्षा महत्वाचे म्हणजे त्यांनी काव्यशास्त्राची निर्मिती करून संतांचे काव्यविचार शास्त्रीय परिभाषेत मांडले आहेत. अद्वैत-भक्तीच्या दार्शनिक अधिष्ठानावर असलेले काव्यमीमांसेचे स्वरूप उलगडून दाखविले आहे. त्यामुळे पुढील काळात श्रीगुलाबराव महाराजांचा काव्यविचार वगळून काव्यशास्त्राचा विचार करणे इष्ट होणार नाही. किंबहुना तसे केल्यास तो काव्यविचार अपूर्ण राहील. महाराजांवर अन्याय करणे होईल. महाराजांच्या या सूत्रांवर भाष्य लिहिले जावे किंवा त्यावर प्रबंध लिहिला जावा इतका तो विषय सखोल, मूलभूत आणि महत्वाचा आहे. आपण या ठिकाणी त्याचा केवळ धावता परिचय करून घेऊ शकतो.





महाराजांच्या ''काव्यसूत्रसंहिता'' या स्वतंत्र काव्यशास्त्रावरील सूत्र ग्रंथात पूर्वीच्या भक्तिकाव्याविषयी असलेल्या ग्रंथांपेक्षा अगदी वेगळी मांडणी आहे. त्यात त्यांनी काव्यशास्त्र आणि भक्तिशास्त्र यांचे परस्परावलंबित्व अगदी शास्त्रीय पद्धतीने स्पष्ट मांडून दाखविले आहे. पूर्वीच्या ग्रंथातील मांडणीपेक्षा महाराजांची मांडणी स्वतःचे आगळे वैशिष्ट्य सिद्ध करते. महाराजांनी –

*** विषयानंदापासून ब्रह्मानंदापर्यंत,**
*** पामर कवीपासून साक्षी कवीपर्यंत,**
*** जडस्वभावदर्शनापासून भक्ति-ज्ञानापर्यंत,**

सर्व पायऱ्या क्रमशः उलगडून दाखवून नंतर भक्तिरूपी महारसाची सिद्धी केली आहे.

महाराज स्वतः संतकवी होते आणि





काव्यशास्त्रज्ञही होते. म्हणून त्यांनी रचलेल्या काव्यशास्त्राचे परिशीलन करून नंतर मराठीतील संतकवींच्या काव्यविषयक स्फुट उद्‌गारांचे मूल्यमापन करणे योग्य होईल. मराठी संतकवींनी भक्तीपर काव्याची निंदा केलेली आढळते. आणि सर्व काव्यनिर्मिती भक्तिपरच असावी असा संतकवींचा आग्रह दिसून येतो. काव्यशास्त्र दृष्टीने या आग्रहाला कितपत स्थान आहे, हे पडताळून पाहणे अत्यंत आवश्यक आहे. हे महत्वाचे कार्य महाराजांच्या काव्यशास्त्राच्या आधाराने करणे सहज शक्य होणार आहे.

समर्थ रामदासादि संतांनी काव्यविषयक सिद्धान्त युक्तिवादपूर्वक आणि शास्त्रीय परिभाषेत न मांडल्यामुळे त्यांच्यावर आक्षेप

घेण्याचे अनेकांना फावते. आणि संतवाङ्मयांचे यथार्थ स्वरूप निव्वळ ''वाक्चातुर्याने सुखी' होणाऱ्या 'इतरेजनांना' कळू शकत नाही यात फारसे आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. पण यापुढे मात्र संतांच्या काव्यविषयक दृष्टिकोणाचा विचार करतांना त्यांची संतभूमिका आणि कविभूमिका या दोहोंचा साकल्याने विचार करावा लागेल एवढे मात्र निर्विवाद. यापुढे संतकवींवर विरोधी टीका करावयाची असल्यास महाराजांचे काव्यविचार समजून घ्यावेच लागतील. मगच संतांच्या काव्य विषयक भूमिकेसंबंधी विरोधी विचार मांडता येतील. इतकी महत्वपूर्ण सूत्ररचना महाराजांनी केलेली आहे.

काव्यसूत्रसंहिता हा ९२ सूत्रे असलेला पांच अध्यायांचा लहानसा सूत्रग्रंथ आहे. त्यात





**(१)काव्यसामुग्री,** **(२)कविलक्षण,**
**(३)स्फूर्तिप्रयोजन,** **(४)लक्षणपाद,**
**(५)ब्रह्मनिष्ठा**

अशी ५ प्रकरणे आहेत. तसेच महाराजांच्या ***भक्तितत्त्वविवेक** या संस्कृत ग्रंथातील दुसऱ्या अध्यायात भक्ती आणि काव्य याविषयी तुलनात्मक विवेचन आले आहे. सूत्रांचा अर्थ समजावून घेताना याच विवरणाचा प्रामुख्याने उपयोग होतो. त्याचप्रमाणे ***साधुबोध** ग्रंथातील मार्मिक प्रश्नोत्तरे, *सातव्या यष्टीतील **पत्रे**[२], ***संप्रदायसुरतरू, *अभंगाची गाथा, *छंदप्रदीप** वगैरे अनेक ग्रंथात काव्यविषयक स्फुट विचार महाराजांनी मांडले आहेत. ***भक्तिपदतीर्थामृत** यात भक्तीतील दहा रसांचे विवेचन तर अगदी नवीन आहे. महाराजांचे





काव्यशास्त्राविषयक विविध विचार एकत्र करून त्यांचा साकल्याने विस्तारपूर्वक अभ्यास होणे अत्यावश्यक आहे.

### <u>**काव्याचे लक्षण व सामुग्री**</u>

काव्याचे लक्षण महाराजांनी अगदी आगळे वेगळे केले आहे.

**सृष्टेः अन्तःस्वरूपं**
**ईश्वरनिविष्टं काव्यम् ॥२॥**

सर्व नामरूपात्मक सृष्टीच्या अन्तरात असलेल्या ईश्वरस्वरूपाच्या आनंदाचा अनुभव आणून देणारे तेच खरे काव्य !

ही व्याख्या प्राचीन काव्यलक्षणाहून अगदी वेगळी असून, सृष्टीच्या माध्यमातून जगत्कारणाकडे म्हणजेच ईश्वरस्वरूपाकडे घेऊन जाणारी काव्याची शक्ती येथे महाराजांना





अभिप्रेत आहे.

* काव्याचे **उपादानकारण** अन्तःकरण आहे.
* **निमित्तकारण** शब्द आहेत आणि
* काव्याचे **अधिष्टान** हे मात्र अन्तःकरणोपहित चैतन्य आहे.
* महरहजांनी कवीला सर्वांच्या वर स्थान दिले आहे. जगताचा कर्ता असलेला ईश्वर आणि शुद्ध ब्रह्मानंदाला प्रगट करणारा कवी; असे ईश्वराचेच दोन प्रकार करून त्यात कवीला वरचढ ठरविले आहे.

### <u>**आनंदाचे प्रकार**</u>

काव्यामुळे होणाऱ्या आनंदाचे महाराजांनी दोन प्रकार केले आहेत -

१- बाह्य विषयापासून होणारा **भोगरूप** आनंद.
२- साक्षीपासून होणारा **स्वयंरूप** आनंद.

हे वेदान्तातील आनंदाचे विश्लेषण साहित्यशास्त्रात घेतल्यामुळे रसांची संख्या आठ, नऊ की दहा वगैरे प्रश्नोपप्रश्नांची संगती देखील चांगल्या रीतीने लावता येते.

उदा :- जगन्नाथ पंडित म्हणतात की भरतमुनींनी नाट्यशास्त्रात आठच रस मानले त्यामुळे अतिरिक्त रस मानण्याचे कारणच नाही. पण -

**आनंदो द्विविधः ॥**
**स्वयंरूपो भोगरूपश्च ॥**

या महाराजांच्या सूत्रांमुळे वाद न करता या अडचणीचा निरास होतो.

भरतमुनींनी नाट्यग्रंथात आठ रसांचे विवेचन केले. त्यावेळी त्यांचेसमोर भागवत आणि भक्तिकाव्ये नव्हती असे नाही. परंतु त्यांचा ग्रंथ





नाट्य या एकाच विषयावर मर्यादित असल्यामुळे नाटकान्तर्गत रसांचेच विवेचन त्यांनी केले. याचे कारण - नाटकाचे रसिक समाजातील प्रत्येक स्तरातील व्यक्ती असतात. त्या सर्वांना रसास्वाद घेता यावा यासाठी नाटकात कोणते रस असावेत? कोणते नसावेत? काय असावे किंवा काय असू नये? याचा विचार भरतमुनींनी केला. सामान्य नाट्यरसिकाला नाटकातील शांतरसाचा देखील आस्वाद घेता येत नाही. तर मग त्याही पलीकडच्या भक्तिरसाचा आस्वाद तो कसा घेऊ शकणार! म्हणून **भरतमुनींनी आपल्या ग्रंथातील विषयाला नाट्यानंदाची म्हणजे भोगरूप आनंदाची सीमा घालून दिली व त्यानुसार रसांचे विवेचन केले.** आणि सामान्य रसिकांच्या योग्यतेनुसार देवविषयक रतीला





रस न म्हणता, 'भाव' संज्ञा दिली.

कोणीही ग्रंथकार असो तो आपल्या प्रत्येक ग्रंथात आपले सर्वच्या सर्व ज्ञान ओतीत नसतो. विषयानुसार मर्यादा घालून मांडणी करतो. त्याचप्रमाणे भरतमुनींनी देखील त्यांचेसमोर भागवतादि भक्तिपर काव्यरचना असूनही आपल्या नाट्यशास्त्रात त्यांनी भक्तिरसाचा अन्तर्भाव केला नाही.

शृंगारादि आठ रस भोगरूप आनंदाचे प्रकार आहेत तर शांत आणि भक्ती हे रस स्वयंरूप आनंदाचे प्रकार आहेत. आणि स्वयंरूप आनंद नाटकात कधीच दाखविता येऊ शकत नाही, ही वस्तुस्थिती आहे.

पुढे काव्यशास्त्राचा विचार करताना अभिनवगुप्तांनी त्यात शांतरसाला स्थान दिले.





त्यानंतर मधुसूदनसरस्वती वगैरे भक्तकवींनी भक्तिरसाचा महारस म्हणून स्वीकार करून त्याला सर्वोच्च स्थान दिले.

एकूण काय तर महाराजांनी आनंदाचे दोन प्रकार उलगडून दाखविल्यामुळे पूर्वसूरींना यत्किंचितही दोष न येता सुसंगती साधली जाते, असे समन्वयाला उपयोगी असलेल आधारसूत्र लिहून महाराजांनी काव्यशास्त्रात महत्वाची भर टाकली आहे, असेच म्हणावे लागते.

## स्थायी भाव

महाराजांनी स्थायी भावाची व्याख्या देखील अशीच वैशिष्ट्यपूर्ण केली आहे. अतिशय थोडक्यात आणि पूर्वाचार्यांच्या विवेचनाला धक्का न लागता केलेले स्थायीचे लक्षण इतरत्र

सांपडणे दुर्लभ आहे -

**विकार-विचारयोरैक्यं स्थायिभाव : ॥२४॥**

विकार आणि विचार यांचे ऐक्य म्हणजे स्थायिभाव.

काव्यामुळे रसिकाचे निव्वळ **'विकार'** उद्‌भूत झाले तर तेथेही लौकिक सृष्टिप्रमाणे खराखुरा सुखांचा व दुःखांचा भोग होईल, पण काव्यामुळे केवळ सुखप्राप्तीच होत असते; म्हणून काव्यसृष्टीत निव्वळ विकार उद्‌भूत होत नाहीत ते विचारासहितच असतात.

बरे, मी काव्याचा अनुभव घेत आहे - अशी जाणीव म्हणजे **'विचार'** मनात सतत प्रामुख्याने कायम राहिला तरीही मन काव्याच्या आशयाशी एकाग्र होऊ शकत नाही व त्यामुळे काव्याचा आनंदही मिळू शकत नाही. म्हणून निव्वळ विचारही स्थायिभाव होऊ शकत नाही.





म्हणून स्थायिभावाचे घटक विकार आणि विचार हे दोन्ही आहेत. काव्याच्या श्रवण-वाचनामुळे स्थायिभाव रसिकाच्या अन्तःकरणात उद्‌भूत होतो व रसिकाचे अन्तःकरण काव्याच्या आशयाशी एकरूप होते आणि रसानंद मिळतो.

काव्याच्या आशयाशी **मन एकाग्र होण्यासाठी** विकाराची आवश्यकता आहे. आणि त्यापासून **दुःख न होण्यासाठी** व केवळ आनंदाचीच प्राप्ती होण्यासाठी विचाराची आवश्यकता आहे.

याप्रमाणे आपपर भाव नाहीसे झाल्यामुळे निर्विघ्न रसप्रतीति येते.

काव्याचा आस्वाद घेण्यापूर्वी ''मी काव्य वाचणार आहे'' अशी जाणीव म्हणजे ज्ञान असते. पुढे काव्यवाचन सुरू झाले की ती





जाणीव गौण होते. आणि अन्तकरणात विकार उद्‌भूत होतात. विकार प्रधान होतात आणि जाणीव गौण होते. विकारांमुळे मन काव्याशयाशी एकाग्र होते व त्या एकाग्रतेमुळे आनंद होतो. - म्हणूनच काव्यातील दुःखद प्रसंगापासूनही दुःख न होता आनंदच होतो. आणि काव्यवाचनाचे शेवटी 'मला काव्याचा आनंद मिळाला' अशी जाणीव- ज्ञातता म्हणजे भोक्तृत्व स्फुरते.

ह्याप्रमाणे काव्यवाचनाचे आधी विचार प्रधान असतो नंतर रसनिष्पत्तीचे वेळी विकार प्रधान होतो व शेवटी पुनः विचार प्रधान होतो.

जसे, आपण एकमेकांशी बोलताना 'मी अमुक अमुक आहे' ही जाणीव बोलण्यापूर्वी असते. पण बोलणे सुरू झाल्यानंतर ती नसल्यासारखी म्हणजे गौण होऊन जाते पण





कायम असते.

त्याचप्रमाणे रसनिष्पत्तीचे वेळी विचार गौण असतो व विकार प्रधान असतो. म्हणून शेवटी काव्य वाचल्यानंतर 'मला काव्यरस मिळाला' ही आनंदाची जाणीव स्फुरत असते.

याप्रमाणे **विचार आणि विकार दोन्ही मिळून स्थायिभाव असतो,** हा महत्वाचा मुद्दा महाराजांनी मांडला आहे.

एके ठिकाणी त्यांनी काव्यरसाचा स्थायी भाव व भक्तिरसाचा स्थायी भाव या दोहोतील मूलगामी फरक भक्तितत्त्वविवेक या ग्रंथातील दुसऱ्या अध्यायात दाखविला आहे.

**द्रुते चेतसि यो बाह्यसंस्कारः स्थायिलक्षणः।**
**उद्भूतः स रसो ज्ञेयो इत्याहुः काव्यवेदिनः ॥३६॥**
**अहंभिन्न आत्मसंस्कारो द्रुते चेतसि यो भवेत् ।**

**फलभिन्नतयोद्भूतः स रसो भक्तिलक्षणः ॥३७॥**

१. द्रव पावलेल्या चित्तात जो 'बाह्यविषयांचा संस्कार' असतो तो काव्यातील स्थायिभाव होय. तो उद्भूत झाला असता रसरूपाला येतो, असे काव्यवेत्ते म्हणतात.

२. द्रव पावलेल्या चित्तात सगुण भगवंताविषयी असलेला 'अहंभिन्न आत्मसंस्कार' हा भक्तिकाव्यातील स्थायिभाव होय.

म्हणजे भक्तिरसाच्या स्थायिभावात बाह्य विषयांचा संस्कार नसून भगवंताच्या सगुण रूपाचा संस्कार असतो. आणि ते रूप 'अहं'हून भिन्न दिसत असले तरी ते माझेच आत्मस्वरूप आहे, असे ऐक्यज्ञानही पूर्ण असते.

**'न तत्र माहात्म्यज्ञानविस्मृत्यपवादः'**

हे नारदीय भक्तिसूत्र येथे सार्थ झालेले असते.





असो. याप्रमाणे स्थायिभावासंबंधी अनेक ठिकाणी महाराजांनी मार्मिक विवेचन करून ठेवले आहे. *स्थायिभाव (तक्ता १) पुढील पानावर-*

**काव्याचे ध्येय : भक्तिरस**

(अरसिक- रसिक- भक्तरसिक)

रसप्राप्तीच्या दृष्टीने पाहिलेअसता, अरसिकापासून सुरवात केली तर भक्तरसिकापर्यंत आनंदप्राप्ती होण्याच्या दृष्टीने, चढता क्रम आहे असे दिसून येते.

लौकिक विषयांपासून खरी वाटणारी सुखदुःखे अनुभवणाऱ्या अरसिकापेक्षा, अलौकिक-काव्यसृष्टीतील नाटकादिकातील दुःखद प्रसंगापासूनही काव्यानंद घेणारा रसिक श्रेष्ठ आहे.

आनंद मिळविणे व आनंदाचा अवधी





**तक्ता १**

**स्थायिभाव**

द्रुते चेतसि बाह्य विषयांचा संस्कार
- **१. काव्यरस**

द्रुते चेतसि अहंभिन्न आत्मसंस्कार सगुण भगवंताचे आलंबन
- **२. गौणभक्तिरस**
  - * श्रौतसंस्कार
  - * परोक्ष
  - * उपाधिरूप
- **३. पराभक्तिरस**
  - * अनुभव
  - * अपरोक्ष
  - * निरुपाधिक





वाढवीत जाणे व शेवटी अखंड आनंदात निमग्न होणे, हे प्रत्येक जीवमात्राचे अपेक्षित ध्येय आहे. काव्याच्या अलौकिक सृष्टीत आनंदाचा अवधी वाढत जात असल्यामुळे अरसिकाचे ध्येय जसे रसिकत्व मिळविणे आहे. त्याचप्रमाणे रसिकाचे ध्येय प्रेमभक्ती मिळविणे हे आहे. कसे ते पाहू-

उदा.- समजा एखाद्या नाटकाला अरसिक व रसिक असे दोघेजण गेले तर नाटकातील दुःखद प्रसंग पाहताना अरसिकाचे लौकिक विकार उद्‌भूत होऊन त्याला खरोखरीचे दुःख होईल. पण रसिकाला मात्र त्या दुःखद प्रसंगापासूनही करुणरस म्हणजे आनंदच मिळेल.

लौकिकसृष्टीत दोघांनाही सुखदुःखे सारखीच होतात पण काव्य-नाटकांचे संगतीत

मात्र रसिकाला दुःखभोग न होता केवळ रसानंदच मिळतो. याप्रमाणे रसिकाच्या जीवनातील निर्भेळ आनंदाचा काल काव्यास्वाद-प्रसंगी वाढत असतो. सृष्टीतील प्रत्येक जीवमात्राचे ध्येय दुःखरहित अखंड सुखप्राप्ती हे असल्यामुळे त्या ध्येयाकडे रसिकाची वाटचाल सुरू होते (त्याला याची जाणीव असो की नसो) असे म्हणावयास हरकत नाही.

वरीलप्रमाणेच रसिक आणि भक्त यांच्यातही आनंदाच्या दृष्टीने असाच भेद असतो. रसिकाला केवळ काव्यसृष्टीत आनंद मिळतो पण लौकिक सृष्टीत मात्र त्याला सुख आणि दुःख खरी वाटून तो सुखी आणि दुःखी होत असतो. -- या उलट भक्ताला मात्र काव्यसृष्टीप्रमाणे लौकिक सृष्टीतही केवळ





आनंदच मिळतो. कारण तो सर्व सृष्टीला चिद्विलास म्हणजे परमेश्वराचे नाटकच अनुभवत असतो. आणि त्यातही विशेष असे की भक्ताला मिळणारा काव्यातील किंवा नेहमीच्या लौकिकातील आनंद, भोगरूप नसून स्वयंरूप असतो. उपास्याशी म्हणजे आलंबनाशी त्याचे नित्य आत्मैक्य असल्यामुळे व नित्य आत्मज्ञान संपन्नता असल्यामुळे -

**''न तत्र माहात्म्यज्ञान-विस्मृत्यपवादः''॥भक्तिसूत्र**

**''विषयोचि ज्यांचा झाला नारायण''॥**

**''समाधीं व्युत्थानी हरि विलसे'' ॥**

अशी भक्ताची स्थिती असते. सर्व सृष्टीत त्याला उपास्याचीच प्रेमप्रतीती येत असल्यामुळे त्याचा आनंद कधीच खंडित होत नाही. ही पातळी काव्यरसापेक्षा निश्चितच उच्च आहे.





भक्तिकाव्याच्या आस्वादाने हळू हळू या पातळीवर रसिक आरूढ होतो.

पण भक्तरसिकाची उच्च अवस्था काव्यरसिकाला एकदम आकलन होत नाही. ज्याप्रमाणे अरसिक व रसिकाला नाटकातील दुःखद प्रसंगापासून रोमांच अश्रुपातादि सारखेच होतात व त्यामुळे अरसिकाला वाटते की रसिकालाही आपल्यासारखेच दुःख होत असले पाहिजे. पण तसे नसते. कारण दुःख सहन न झाल्यामुळे अरसिक तेथून पलायन करतो तर रसिक पुनः पुनः त्या काव्याशयाचा आस्वाद घेतो. ते दुःख खरे वाटले असते तर रसिकाने पुन्नपुनः आस्वाद कधीच घेतला नसता.

या ठिकाणी अरसिकाला रसिकाची मानसिक अवस्था आकलन होत नाही.





त्याचप्रमाणे भक्ताची अखंड आनंदाची स्थिती सामान्य लोकांना आकलन होऊ शकत नाही. कारण नाटकात अरसिक व रसिकाचे अश्रुपाताचि जसे सारखेच असतात तसे सामान्य लोक आणि भक्त यांच्या व्यवहारातील सुखदुःखात्मक प्रसंगातील प्रतिक्रिया सारख्याच असतात, पण अंतरंगात मात्र फरक असतो. त्याचप्रमाणे भक्तांचे सर्व विषय नारायणरूप झाले असतात. त्यांना सुखदुःखात्मक सर्व प्रसंगातून केवळ आनंदाचीच प्रतीती येत असते. ''आनंदे भरीन तिन्ही लोक'' ही त्यांची प्रतिज्ञा वास्तवात आलेली असते. एकूण काय तर –

* प्रथम लौकिक सुखदुःखात्मक सृष्टीतून काव्याच्या आनंदमय अलौकिक सृष्टीत प्रवेश करणे. ही पहिली पायरी असून

*  त्यातून पुढे भक्ताच्या चिद्विलास सृष्टीत प्रवेश करणे म्हणजे भक्तिरसाचा भक्त होऊन रसास्वाद घेणहेच प्रत्येक मानवाचे अंतिम साध्य आहे.

याप्रमाणे अलौकिक काव्यसृष्टी ही मानवाच्या ध्येय मार्गावरील मधली पायरी आहे. खरोखर पाहता काव्य, चित्र, नृत्य, संगीत वगैरे सर्व कला आणि सर्व प्रकारची प्राचीन भारतीय शास्त्रे ही केवळ मनुष्याने निर्भेळ स्वयंरूप आनंद प्राप्त करून घ्यावा, यासाठीच आहेत आणि त्या त्या वेगवेगळ्या माध्यमांच्या द्वारा प्राचीन भारतीयांनी ते सर्वोच्च ध्येय गाठलेही होते. हा निर्भेळ स्वयंरूप आनंद, त्या त्या शास्त्रांचा आधार घेऊन हळू हळू प्राप्त करून घेण्यातच त्या सर्व ऋषीप्रणीत





शास्त्रांची इतिकर्तव्यता आहे. असो.

खरोखर भोगरूप आनंदही, एकाग्रतेमुळे मिळणारा आहे म्हणून मूलतः स्वयंरूपच आहे. पण ही जाणीव नसल्यामुळे म्हणजे अज्ञानामुळे तो आनंद प्रत्येक जण बाह्य विषयावर आरोपित करीत असतो. तेवढे अज्ञानाचे आवरण दूर झाले की भोगरूप आनंद हाच स्वयंरूप आनंद आहे याचा अनुभव येतो. याप्रमाणे -

**''लौकिक सृष्टीतील (व्यवहारातील) विषयानंदाचे पर्यवसान अलौकिक काव्यानंदात व काव्यानंदाचे पर्यवसान शेवटी भक्तिरसाने मिळणाऱ्या स्वयंरूप आनंदात आहे.''**

हे सर्व संतकवींचे मनोगत काव्यसूत्रसंहितेत महाराजांनी सूत्ररूपाने व्यक्त केले आहे, असे दिसून येईल.





## आनंदप्राप्ती

### भोगरूप व स्वयंरूप

**१.** व्यवहारातील प्रतिकूल संवेदनीय दुःखद प्रसंगापासून दुःख होते आणि अनुकूल संवेदनीय असलेल्या सुखद प्रसंगापासून आनंद होतो. हाच विषयानंद म्हणजे भोगरूप आनंद होय.

**२.** द्रव पावलेल्या अन्तःकरणात जो बाह्य विषयांचा संस्कार असतो तो स्थायिभाव असून तोच चर्वणेला आला असता काव्यसृष्टीत रसानंद मिळतो. हाही भोगरूप आनंदच होय.

**३.** द्रव पावलेल्या अन्तःकरणात जो सगुण भगवंताच्या गुणानुवाद श्रवणाचा संस्कार झालेला असतो. तो संस्कार श्रौत म्हणजे पुराणातील वर्णने ऐकून झालेला असतो. हा





सगुण भक्तीचा परोक्ष संस्कार, केवळ शाब्द म्हणजे आप्तवचनांनी मनावर झालेला संस्कार, गौण भक्तीतील म्हणजे उपासनेतील स्थायिभाव होय.

भक्तिकाव्यात रंगल्यामुळे सामान्य रसिकांचा म्हणजे आत्मज्ञान नसलेल्यांचा गौणभक्तीतील स्थायिभाव चर्वणेला येतो व गौणभक्तिरस मिळतो.

**४.** सज्ञानभक्तांच्या द्रवित अन्तःकरणात असलेल्या आत्मरूप सगुणभगवंताचा साक्षात्कार होऊन त्याचा संस्कार राहणे हा पराभक्तीतील स्थायिभाव होय. येथे जीवशिवांचे पूर्णऐक्य म्हणजे परिपूर्ण आत्मज्ञानसंपन्नता असते.

* येथे भक्तिरसाचे आलंबन असलेला सगुण-साकार भगवद्विग्रह जरी स्वयंभिन्न वाटत

असला तरी आत्मभिन्न नसतो, भिन्न-इव असतो.

* हा स्थायिभाव आस्वाद्यमान झाला असता भक्तिरसातील शुद्ध स्वयंरूप आनंद मिळतो.

याप्रमाणे उत्तरोत्तर प्रयत्नपूर्वक वरची वरची आनंदाची अवस्था प्राप्त करून घेणे आवश्यक आहे. असे केले नाही तर भक्ति-काव्यातील रसाचा आस्वाद न मिळाल्यामुळे परिपूर्ण रसिकत्व देखील प्राप्त होऊ शकत नाही. काव्यात भक्तिकाव्याचाही अन्तर्भाव असल्यामुळे खऱ्या रसिकाने भक्तिरसाचा पूर्णपणे आस्वाद घेण्याइतपत आपली मानसिक पातळी वाढविली पाहिजे. असे महाराजांच्या काव्य-शास्त्रावरून लक्षात येते.





**तक्ता २**

**कवीचे ३ प्रकार**

| **१ - उच्छिष्ट** | **२ - भोक्ता** | **३ - साक्षी** |
|---|---|---|
| परकल्पना-ग्रथक | भोगानंद-ग्राहक | विकार उत्पन्न झाले असता, त्यांना जाणून, अविकारी असलेला. |
| **१.पामर** | **२.विषयी** | **३.महात्मा** |





## कवीचे३ प्रकार

काव्यसूत्रसंहितेत श्री महाराजांनी **'कवि-लक्षण'** या प्रकरणात कवीचे तीन प्रकार केले आहेत. जुने कवी आणि नवे कवी या दोघांनाही या तीन प्रकारात बसविता येते.(तक्ता२)

**१.**उच्छिष्टकवी

**२.**भोक्ताकवी

**३.**भक्तकवी

यापैकी **उच्छिष्ट कवी** त्याज्य असून **'भोक्ता कवी'** हाच कवी म्हणून लौकिकात ओळखला जातो. **भक्तकवी** मात्र तिसऱ्या उच्च प्रकारात मोडतो. (**तक्ता** २)–

**१. उच्छिष्ट कवी** –

दुसऱ्याच्या कल्पना चोरून कविता करणारे उच्छिष्ट कवी असून त्यांना महाराजांनी





पामर म्हटले आहे.

**२. भोक्ता कवी** –

दृश्य सृष्टीतील विषयांच्या आनंदाचा आस्वाद घेऊन काव्य करणारे सर्व कवी भोगरूप आनंद म्हणजे विषयानंद घेणारे होत. भक्तकवी सोडून सर्वच कवींचा यात अन्तर्भाव होतो.

**३. साक्षी कवी** –

विकार मनात उत्पन्न झाल्यावर जो विकारांना जाणतो व अविकारी होतो तो साक्षी कवी. हा विकारांच्या साह्याने स्वयंरूप आनंदाचीच अभिव्यक्ती आपल्या काव्यात करीत असतो. हाच भक्तकवी होय.

स्फूर्ति लक्षण[१] व प्रकार तक्ता ३








## स्फूर्ति

### लक्षण[१] व प्रकार

काव्यसूत्रसंहितेतील स्फूर्तिलक्षण या प्रकरणात महाराजांनी अन्तःकरणाला उल्हसित करून काव्याला जन्म देणाऱ्या स्फूर्तीचेतीन प्रकार केले आहेत.

* नैसर्गिकी
* वैचारिकी
* स्वयम्

**१. नैसर्गिकी –**

* विषयसंस्पर्शाने उत्पन्न होणारी
* परतंत्र
* जडस्वभावाचे दर्शन करून देणारी
* वासनांची वृद्धी करणारी.





**२. वैचारिकी –**

* विदितविषयानंदसंस्पर्शाने उत्पन्न होणारी
* कवीच्या अंतःकरणाचे दर्शन करून देणारी
* नीतिलाभ करून देणारी.

**३. स्वयम् –**

* भगवद्पादस्पर्शोन्उत्पन्न होणारी
* ब्रह्मानंदाची अभिव्यक्ती करणारी
* भक्ति व ज्ञानाची प्राप्ति करून देणारी

**१. नैसर्गिकी स्फूर्ती –**

ही नैसर्गिक स्फूर्ती प्रत्यक्ष विषयभोगा-शिवाय उत्पन्न होत नाही. यात जसेच्या तसे वर्णन केलेले असते. मानसभावांपेक्षा शारीरिक वर्णनच अधिक असते. या स्फूर्तीमुळे कवीच्या आणि रसिकाच्या दोघांच्याही निव्वळ वासना





वाढतात. ही स्फूर्ती केवळ विषयसंस्पर्शाने उत्पन्न होणारी असल्यामुळे विषयांच्या परतंत्र आहे. हिने केवळ जडस्वभावाचे म्हणजे शारीरिक विकारांचे मुख्यतः प्रदर्शन असते.

या स्फूर्तीच्या लक्षणाच्या आधाराने आधुनिक मराठीतील अश्लील वाङ्मयाचे किंवा वास्तववाद वगैरे अनेक वादांचे विश्लेषण करून त्यांचे भारतीय साहित्यशास्त्रानुसार योग्य स्थान ठरविता येते.

**२. वैचारिकी स्फूर्ती –**

चांगल्या कवीची स्फूर्ती वैचारिकी असते. प्रत्यक्ष व्यवहारातील सुखदुःखात्मक प्रसंगातील आशय पुनः मानसप्रत्यक्ष करून म्हणजेच विदित विषयानंदाच्या संस्पर्शामुळे ही स्फूर्ती कवीला काव्य करण्यास प्रवृत्त करते. या स्फूर्तीने निर्माण

झालेल्या कवितेत कवीच्या अन्तःकरणाचे दर्शन होते, वासनांचे नव्हे ! त्याचप्रमाणे या काव्याच्या आस्वादाने रसिकाच्या वासना वाढत नाहीत. उलट रसिकाला एक उच्च प्रकारचा सात्त्विक आनंद प्राप्त होतो. अन्तःकरण वरच्या पातळीवर जाते. नीतिमत्ता वाढते. म्हणून हिला भारतीय साहित्यशास्त्रात अलौकिक सृष्टी उत्पन्न करणारी प्रतिभा म्हटले आहे.

**३. स्वयंस्फूर्ती –**

भगवद्पादसंस्पर्शात् म्हणजे सगुण साक्षात्कार झाल्यामुळे भक्त आपले सर्व विकाराभास- सर्व प्रकारचे प्रेमकाव्यरूपाने भगवंतावर अर्पण करू लागतो, शब्दद्वारा व्यक्त करतो. यातून केवळ स्वयंरूप आनंद म्हणजे ब्रह्मानंदच प्रगट होतो.





या भक्तिकाव्याचा रसिकाने (किंवा उपासकाने) सतत अभ्यास केला असता, रसिकाच्या अन्तःकरणाची उंची वाढते आणि शेवटी भक्तकवी-प्रमाणे तोही स्वतः भक्तच होऊन जातो. या काव्यातील भाषा समाधिभाषा असते. यातील शब्द आत्मा अवतरविणारे मंत्र असतात. तुकाराम महाराजांनी देखील ‘‘पाठ केली संतांची उत्तरे’’ प्रथम संतांचे अभंग पाठ केले. नंतर त्यांना साक्षात्कार झाला असे तेस्वतः एका अभंगात म्हणतात. म्हणून भक्तिकाव्याचे फल आत्मज्ञानाची आणि भक्तीची प्राप्ती होणे होय

**भक्तिज्ञानप्राप्तिश्च ॥१३॥**

असे श्रीगुलाबरावमहाराज सांगतात. हाच काव्याचा परमोत्कर्ष होय. अन्ततो गत्वा आत्मज्ञान आणि भक्तीने प्राप्त होणारा व कधीही





लोप न पावणारा परमानंद प्राप्त करून घेणे हेच कवितेचेही अंतिम महाफलित आहे. आणि याचाच सर्वसंतकवींनी उद्‌घोष केला आहे. संत एकनाथांच्या शब्दात सांगावयाचे म्हणजे –

**प्रतिपदीं प्रतिपादावे परब्रह्म ।**
**हाचि कवित्वाचा कवित्वधर्म ॥**

एकूण महाराजांच्या काव्यशास्त्रीय विवेचनावरून असे दिसते की संतांच्या स्फुट काव्यविचारांना युक्तिसिद्ध शास्त्राची बैक असल्याचे महाराजांनी दाखवून दिले. त्यांनी लिहिलेले काव्यसूत्रसंहिता व भक्तितत्त्वविवेक हे दोन्ही ग्रंथ साहित्यिकांपुढे सविस्तर भाष्यरूपाने येणे आवश्यक आहे. पूर्वसूरींच्या संस्कृत रससिद्धान्ताचा परिपाक असलेल्या महाराजांच्या शास्त्रीय दृष्टिकोणाने रसांची





संख्या, स्थायिभावाच्या स्पष्टीकरणातून करुणरसाचे आनंददायित्व, वगैरे अनेक विषयांवर चांगला प्रकाश पडतो.

आधुनिक साहित्यातील कलेसाठी कला, वास्तववाद, अस्तित्ववाद, अश्लीलतेचा सन्मान, वगैरे अनेक नवीन नवीन विचारसरणींचे मूल्यमापनही भारतीय दृष्टिकोणातून करावयाचे असल्यास महाराजांच्या काव्यशास्त्रीय विवेचनाचा निश्चितच उपयोग होणार आहे. या दृष्टीने महाराजांचे काव्यशास्त्रविषयक विचार मूळातून समजून घेणे अगत्याचे आहे. कमीत कमी संतांवर अन्याय्य आरोप करण्यापूर्वी एकदा तरी महाराजांचे काव्यशास्त्रीय विवेचन समजावून घेणे आवश्यक आहे, हे निश्चित!

**संदर्भ टीपा :-**

(१)भक्तिहीन जे कवित्व । तेचि जाणावे ठोंबे मत ॥ समर्थ रामदास स्वामी.

वेदशास्त्राचे मथितार्थ । झाले करतलामलक समस्त । तैसाचि ब्रह्मानंदे डुल्लत । कवि निश्चित या नांव ॥१०४८॥ उपनिषदांचा मथितार्थ । ज्याच्या मुखाची वास पहात । परोक्षापरोक्ष ज्याचेनि सत्य । कवि विख्यात त्या नाव ॥१०४९॥ एक. भाग.अ.१२.

बोलू ऐसे बोल । जेणे बोले विठ्ठल डोले ॥ संत नामदेव अभंग१५२२.

(२) य.७पान ८५ ते ९०.

(३) भक्तितत्त्वविवेक अ. २ य. १६.

(४) भक्तितत्त्वविवेक अ.२श्लोक ३६ ते ३९.

(५) काव्यसूत्रसंहिता पाद२,य.१६पा.२९२-९३.

(६) काव्यसूत्रसंहिता पाद३,य.१६,पा२९३

०००





<u>परिशिष्ट १ -</u>

# **काव्यसूत्रसंहिता** (मूल)

उमा माता पिता शंभुर्गुरुर्ज्ञानेश्वरो महान् ।
पतिःकृष्णो राधिकाद्या भगिन्यो गोपिका मम ॥१॥
पंचायतनमित्येतत् हृद्यास्थाप्य प्रपूज्य च ।
प्रणम्य सम्यक् वक्ष्येऽहं काव्यशास्त्रमनुत्तमम् ॥२॥

**प्रथम पादः**

## **काव्यसामग्रीविचारः**

अथातः काव्यं व्याख्यास्यामः ॥१॥
सृष्टेरन्तःस्वरूपम् ईश्वरनिविष्टं काव्यम् ॥२॥
तदेव बहिःस्वरूपं चित्रम् ॥३॥
अन्तःकरणद्रव्यं काव्योपादानम् ॥४॥
अन्तःकरणोपहितं चैतन्यं काव्याधिष्ठानम् ॥५॥
स्थूलद्रव्यं चित्रोपादानम् ॥६॥





स्थूलावच्छिन्नं चैतन्यं चित्राधिष्ठानम् ॥७॥
काव्यचित्रयोरैक्यम् ॥८॥
ईश्वराधिष्ठानदृष्ट्या काव्यचित्रयोरैक्यम् ॥९॥
ईश्वरो द्विविधः - कविः कर्तेति भेदात् ॥१०॥
जगत् स्थितिलयकारणं कर्ता ॥११॥
ब्रह्मानन्दप्राकट्यकारणं कविः ॥१२॥
आनन्दो द्विविधः भोगरूपः स्वयंरूपश्च ॥१३॥
भोगरूपो बाह्यविषयेभ्यः ॥१४॥
साक्षिणोऽन्यः ॥१५॥
आद्यो मूर्खाणाम् ॥१६॥
द्वितीयो विदुषाम् ॥१७॥
द्वयोर्मिश्रणं वर्णनम् ॥१८॥
तन्निमित्तं शब्दः ॥१९॥
शाब्दिकवर्णनं काव्यप्रचयः ॥२०॥
स द्विविधोऽवयवव्यक्ति-रसव्यक्तिभेदात् ॥२१॥





बाह्य-स्वभाववर्णनम् अवयवव्यक्तिः ॥२२॥
अन्तरान्दप्रकटनं रसव्यक्तिः ॥२३॥
विकारविचारयोरैक्यं स्थायिभावः ॥२४॥
बाह्यनिमित्तं विभावः ॥२५॥
दृष्टनिमित्तक आलम्बनविभावः ॥२६॥
गुणनिमित्तक उद्दीपनविभावः ॥२७॥
परिणामनिमित्तकोऽनुभावः ॥२८॥
निमित्तोपादानाभ्याम् अधिष्ठानानन्दव्यक्ति रसः ॥२९॥
'रसो वै सः' इति श्रुतेः ॥३०॥
'रसो व्रतेति-अग्निपुराणात् ॥३१॥

॥ हरिः ॐ तत्सदिति काव्यसूत्रसंहितायां
काव्यसामग्रीविचारो प्रथमः पादः॥

०००

### द्वितीयपादः

## कविलक्षणविचारः

कविर्द्विविधः ।।१।।

ईश्वरो जीवश्च ।।२।।

तदंशाज्जीवोऽपि कविर्भवितुमर्हति ।।४।।

जीवकविस्त्रिविधः ।।५।।

उच्छिष्टो भोक्ता साक्षीति भेदात् ।।६।।

परकल्पनाग्रथक उच्छिष्टः ।।७।।

भोगानन्दग्राहको भोक्ता ।।८।।

विकारसंस्थाने विकारान् ज्ञात्वाऽविकारी भवतीति साक्षी ।।९।।

प्रथमो पामरः ।।१०।।

मध्यमो विषयी ।।११।।

तृतीयो महात्मा ।।१२।।

ईश्वरकविरेकविध एव ।।१३।।





प्रियोक्तेः ।।१४।।

।। हरिःॐतत्सदिति काव्यसूत्रसंहितायां
कविलक्षणविचारो द्वितीयः पादः।।

०००

### तृतीयपादः

## स्फूर्तिप्रयोजनम्

स्फूर्तिस्त्रिधा नैसर्गिकी वैचारिकी स्वयं भेदात् ।।१।।

विषयसंस्पर्शात्प्रथमा ।।२।।

साच परतन्त्रा ।।३।।

विदितविषयानन्दसंस्पर्शान्मध्यमा ।।४।।

सा शास्त्रतन्त्रा ।।५।।

भगवत्पादसंस्पर्शात् तृतीया ।।६।।

सा शुद्धा ।।७।।

प्रथमस्फूर्तिजं जडस्वभावदर्शनम् ।।८।।

द्वितीयस्फूर्तिजम् अन्तःकरणदर्शनम् ।।९।।





तृतीयस्फूर्तिजं ब्रह्मानन्दव्यक्तीकरणम् ।।१०।।

प्रथमया वासनावृद्धिः ।।११।।

द्वितीयया नीतिलाभः ।।१२।।

तृतीयया भक्तिज्ञानप्राप्तिश्च ।।१३।।

।। हरिः ॐ तत्सदिति काव्यसूत्रसंहितायां
स्फूर्तिप्रयोजनं नाम तृतीयः पादः।।

०००

### चतुर्थपाद

## लक्षणपादः

सृष्टिर्द्विधा ईश्वरजा जीवजेति भेदात् ।।१।।

तत्रेश्वरजा बाह्यद्रव्यगुणमयी ।।२।।

जीवजा भावनामयी ।।३।।

ईश्वरसृष्टिप्रधान-भावनागौण्यम् चित्रम् ।।४।।

भावनाप्रधान ईश्वरसृष्टिगौण्यम् काव्यम् ।।५।।

एकविधा वा सृष्टिर्भावनामयी ।।६।।





सा त्रिधा मृदु-मध्य-तीव्रभेदात् ।।७।।

तत्र तीव्रसंवेगान्मृदुसंस्कारो भोगः ।।८।।

मृदुसंवेगात्तीव्रसंस्करणमुत्पत्तिः ।।९।।

भोगो मूढानाम् ।।१०।।

उत्पत्तिः कवीनाम् ।।११।।

मध्यमा चित्रीकरणम् ।।१२।।

द्रव्याश्रयेण तीव्रानन्ददर्शनं वा चित्रम् ।।१३।।

अंतःकरणाश्रयेण तीव्रानन्ददर्शनं वा काव्यम् ।।१४।।

मध्यमो विचारः ।।१५।।

।। हरि ॐ तत्सत् काव्यसूत्रसंहितायां
लक्षणपादः चतुर्थः।।

०००

**पंचमपादः**

## ब्रह्मनिष्ठा

कवित्वं साध्यं सर्वैः ॥१॥

सद्यः परनिर्वृतिदर्शनात्॥२॥

अधमं मध्यमं हेयम् ॥३॥

उत्तमं ग्राह्यम्॥४॥

तच्च ईश्वरसंस्पर्शात् सिध्यति ॥५॥

स्वप्नध्यानाद्वा ॥६॥

बहुजन्मकृताभ्यासाद् वा ॥७॥

अत्यन्तरसनिविष्ट-साक्षात्काराद् वा ॥८॥

विचारकर्तव्येऽपि विचारशून्यानन्दप्राप्तेर्वा ॥९॥

ईश्वरपादसंस्पर्शस्तु नियत उपायः ॥१०॥

अन्येऽनियताः ॥११॥





ध्रुवमुखशंखसंस्पर्शेतिहासात् ॥१२॥

सर्वेषां विकाराणां वर्णनेऽपि सावधानत्वं साक्षित्वम् ॥१३॥

गुणानामपि ॥१४॥

सैव जीवन्मुक्तिः सा ब्रह्मनिष्ठा ॥१५॥

चतुर्दशे प्रियोक्तेः ॥१६॥

॥ हरिःॐ तत्सत् काव्यसूत्रसंहितायां पंचमः पादः॥

०००

..........................................................





परिशिष्ट २

य७. पत्र ८. तांबे यांना

*आनंद : व्यक्त व अव्यक्त*

**आनंदोपि द्विधा ज्ञेयोऽव्यक्तव्यक्तविभेदतः ।**
**अव्यक्तो ज्ञानयोगाभ्यां समाधावनुभूयते ॥१८॥**
**योगो भक्तिप्रधानः ईश्वरप्रणिधानाद्वेति पातंजलात्॥**

आनंदही दोन प्रकारचा आहे; अव्यक्त आणि व्यक्त; ह्यापैकी अव्यक्त आनंद, ज्ञान आणि योग ह्यानें प्रतीत होतो. येथें योग भक्तिप्रधान घ्यावयाचा कारण ईश्वराच्या भक्तीनें निश्चयानें योग होतों असें पतंजलींचें योगसूत्र आहे. **(य ७-८४)**

**व्यक्तोपि ज्ञानभक्तिभ्यामन्वयाच्चानुभूयते ।**
**हार्दगोचरभेदेन पुनः सोऽपि द्विधा मतः ॥१९॥**
**प्रेमैकलक्षणो हार्दो घनवृत्त्या सगोचरः ।**
**साहित्यशास्त्रयोगेन काव्यबोधेन लक्ष्यते ॥२०॥**

**अत्र भक्तिस्तु भगवदेकाकारतया प्रेमामृतधारा बोध्या । सा चोक्ता प्रेमरसायने-**





**''द्रुतस्य भगवद्धर्म धारावाहिकतां गता''।**
**सर्वेशे मनसो वृत्तिर्भक्ति-रित्यभिधीयते ।**
**उपासनाव्यावृत्त्यर्थं ज्ञानसंयुक्तत्वम् ।**

भक्ती ह्मणजे भगवंताचें ठिकाणीं एकसारखीं प्रेमानें वृत्ति लागून राहणें. द्रवीभूत झालेल्या चित्ताची तैलवत् अविच्छिन्न धारा परमेश्वराच्या चरणाकडेच गंगेसारखी वाहत जाणें ह्मणजे भक्ति होते, असें भक्तिरसायनांत सांगितलें आहे.

ती ज्ञानसंयुक्त झाली ह्मणजे समाधि नसतांनाही, अन्वयामुळें व्यक्तानंदाचा प्रत्यय येतो.

उपासनेहून ही भक्ति निराळी आहे, असें दाखविण्याकरितां ज्ञानसंयुक्तत्व पद घातले आहे.

तो व्यक्तानंदही दोन प्रकारचा आहे. *हार्द आणि *गोचर. हार्द ह्मणजे हृदयांत असणारा व गोचर म्हणजे बाहेरही प्रगट दिसणारा.

हृदयांतल्या हृदयांतच अतिशय प्रेमाचे उमाळे येणें, हाच **हार्द** असून तोच प्रेम अतिशय तीव्र होऊन, वाचेनें व नाना प्रकारच्या चिन्हानें प्रगट होणें, ह्याला

(६१)

**गोचर** ह्मणतात. **हा गोचर व्यक्तानंद साहित्यशास्त्रानें व काव्यानें समजतो.**

*साहित्यातील व्यक्तानंद*

**काव्यं च द्विविधं ज्ञेयं श्राव्य-दृश्यविभेदतः ।**
**श्राव्यं तु केवलं शाब्दं हार्दो यस्मात् स्फुटीभवेत् ॥२१॥**

आतां काव्यही दोन प्रकारचें आहे. ऐकण्याला योग्य व पाहण्याला योग्य. ऐकण्याला जें योग्य काव्य तें केवळ शब्दमय असून, शब्दानेंच बनलेलें असतें. व त्याच्यायोगानें हार्द व्यक्तानंद स्पष्ट होतो. ह्मणजे शब्दात्मक काव्य ऐकून हृदयांतच प्रेम व्यक्त होतो.

**श्राव्यं पुनर्द्विधा प्रोक्तं नाद-वाक्यप्रधानतः ।**
**नादमुख्यं भवेद्गीतं सार्थं वाक्यप्रधानकम् ॥२२॥**

तेंच ऐकण्याला योग्यही काव्य दोन प्रकारचें आहे. नादानेंच गार करून टाकणारे व अर्थानें गार करून टाकणारे ! (य७-८५) पैकीं पहिल्याचें नांव



(६२)

**गान (म्युझिक्)** असून दुसऱ्याचें नांव वाक्य-प्रधान ह्मणजे **काव्य** आहे.

काष्ठ, पाषाण, धातु, रत्न इत्यादि जडपदार्थांच्या योगानेंच गोचर ब्रह्मानंद स्पष्ट करणारे असून -

दुसरें पशुपक्षी,मनुष्य इत्यादि सजीव प्राण्यांचे साह्य घेऊन गोचर ब्रह्मानन्द स्पष्ट करिते.

**प्रथमं मूर्तिचित्रादि रूपेणैव निगद्यते ।**
**द्वितीयं नाटकादि स्यात् सजीवाविष्टमेव तत् ॥२४॥**

पहिलें **दृश्यकाव्य** मूर्ति चित्र वगैरे रूपांचे असून दुसरें सजीव प्राण्यांचा रूपांचे ह्मणजे नाटक-प्रकरण-भाण इत्यादि रूपांचें आहे.

**उपपत्तिस्त्विति प्रोक्ताधुना वक्ष्ये प्रयोजनम् ।**
**क्रमप्राप्तं विजानीहि सावधानतया बुध ॥२५॥**

याप्रमाणें सच्चिदानन्द स्पष्ट करणाऱ्या शास्त्राची उपपत्ति सांगून आतां या भक्तिबोधक



(६३)

काव्यशास्त्राचे- समयानेंच प्राप्त झालेलें- प्रयोजन सांगतों. तें सावधानपणानें ऐक.

**स्मृतौ तु यदिदं प्रोक्तं काव्यालापांश्च वर्जयेत् ।**
**तद्वाक्यं भगवल्लीलाभिन्नकाव्यनिषेधनम् ॥२६॥**

आतां काव्यालाप वर्ज्य करावें म्हणून जे स्मृतींत सागिंतलें आहे, ते शिवविष्णु इत्यादि भगवल्लीला ज्यांत नाहींत अशा जडसृष्टीवर्णनपर काव्याविषयीं किंवा स्त्री, केरसुणी वगैरे वर्णनपर काव्याविषयी समजावें.

*(यष्टी७वी. पत्र ८. तांबे यांना)..................................*





(६४)



This document was created with Win2PDF available at http://www.win2pdf.com.
The unregistered version of Win2PDF is for evaluation or non-commercial use only.
This page will not be added after purchasing Win2PDF.